## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २० : ध्येयाचा मार्ग सुखकर नाही मात्र अडथळयांवर मात केल्यास व ध्येय साध्य करण्याची जिद्द कायम ठेवल्यास निश्चित ध्येय प्राप्ती करता येईल असे प्रतिपादन जळगाव येथील उद्योजक व वेगा केमिकल्सचे संचालक श्री. भालचंद्र पाटील यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील नवसंशोधन,नवोपक्रम व साहचर्य मंडळातर्फे (केसीआयआयएल) आयोजित तीन दिवसीय स्टार्टअप अंतर्गत विशेष कौशल्य शिबीरात (स्टार्टअप बुटकॅम्प) आज दि. २० नोव्हेंबर, २०२५ रोजी केले.

यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, केसीआयआयएलचे संचालक प्रा. अरूण इंगळे, नवसंशोधन,नवोपक्रम व साहचर्य मंडळाचे, संचालक डॉ. राजेश जवळेकर उपस्थित होते. पुढे बोलतांना श्री. भालचंद्र पाटील म्हणाले की, उद्योजक म्हणून यशस्वी होण्यासाठी स्वत:ला गुंतवूण घेवून निर्धाराने कार्यरत राहणे, स्वत:ची बलस्थाने ओळखणे, जोखीम घेण्याची तयारी असणे व ज्या उद्योगात काम करायचे आहे त्याचा परिपूर्ण अभ्यास असणे आवश्यक असते. केवळ पुस्तकी ज्ञानावर विसंबून न राहता अवती भवतीचे ज्ञान व घडामोडी माहित असणे आवश्यक असते. स्वत:चा इन्स्पीरीशेन व मोटीव्हेशनचे ग्राफ हाताळण्याचे कौशल्य देखील असावे असे सांगून त्यांनी त्यांच्या यशस्वी उद्योजकाचा प्रवास कथन केला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी सांगितले की, तुमच्यातील कल्पनांना भरारी देण्यासाठी केसीआयआयएल तर्फे प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन व मदत करण्यास येईल. नवउद्योजकांनी स्वत:शी मन:पूर्वक कमिटमेंट ठेवावी, परिपूर्ण ज्ञान व निर्णयातील स्पष्टता ठेवावी. विद्यापीठाकडून नवउद्योजकांसाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत त्याचा फायदा घ्यावा.

हे शिबीर दि. २० ते २२ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. यावेळी या शिबीराचे समन्वयक मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नवीन खंडारे, योगेश पाटील व शिबीरात सहभागी ३० नवउद्योजक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशनी जैन यांनी केले. उद्घाटन सत्रानंतर सुप्रीम इंडस्ट्रीजचे, वरीष्ठ जनरल मॅनेजर विवेक तोंड्रे यांनी आईस ब्रेकर, उद्योजकांचे व्यक्तीमत्व व छत्रपती संभाजीनगरचे रवी कोंबडे यांनी संकल्पना ते सोल्युश फिट, ग्राहकांना कसे ओळखावे या विषयांवर नवउद्योजकांना मार्गदर्शन केले. उद्या दि. २१ नोव्हेंबर रोजी डॉ. नवीन खंडारे, डॉ. युवराज परदेशी, श्रीकांत पाटील, उल्हास भाळे, सीए पंकज दारा व अक्षर गव्हाने हे मार्गदर्शन करणार आहेत.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २० नोव्हेंबर, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता